पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक ५

## सभावृत्तांत

दिनांक - ०७/०८/२०१३ वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०७/०८/२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.बोकड रामदास गेणभाऊ - सभापती
२) मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४) मा.भारती फरांदे
५) मा.काळे विमल रमेश
६) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.पानसरे – क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-**

विषय क्र.१) शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मा.क्रीडा समिती मार्फत मा.स्थायी समितीची मान्यता घेणेबाबत.

विषय क्र.२) राज्यस्तरीय सॉफ्ट बॉल महापौर चषक स्पर्धा घेणेबाबत - मा.विमल काळे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) हेडगेवार भवन प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील व्यायामशाळा वाढविणे, पेंटींग करणेबाबत - मा.विमल काळे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथील हेडगेवार ग्राऊंड फुटबॉल व खो-खो खेळासाठी तयार करणेबाबत - मा.विमल काळे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) महापौर चषक स्पर्धा आयोजनाबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमल काळे, यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) क्रीडा साहित्य मिळणेबाबत - मा.रामदास बोकड, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.वसंत लोंढे अनुमोदक - मा.धनंजय आल्हाट

पाकीस्तानने भारतीय सीमेवर केलेल्या भ्याड हल्यात मृत्यूमुखी पडलेल्या भारतीय जवानांना श्रध्दांजली वाहून व पाकीस्तानने केलेल्या भ्याड हल्याचा निषेध करुन सोमवार दिनांक १२/०८/२०१३ दुपारी १.०० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

सभापती - सोमवार दिनांक १२/०८/२०१३ दुपारी १.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( बोकड रामदास गेणभाऊ )
**सभापती**
मा.क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.क्रिडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक ५

**सभावृत्तांत**

( दिनांक ०७/०८/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक - १२/०८/२०१३ वेळ - दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची दिनांक ०७/०८/२०१३ ची तहकूब सभा सोमवार दिनांक १२/०८/२०१३ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.बोकड रामदास गेणभाऊ - सभापती
२) मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
३) मा.भारती फरांदे
४) मा.काळे विमल रमेश
५) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.पवार – कार्यालय अधिक्षक, मा.पानसरे – क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

दिनांक १७/०७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्र. ४ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक - १
दिनांक - १२/०८/२०१३ विभाग - क्रीडा
सूचक - मा.भारती फरांदे अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे
संदर्भ : मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/६३६/२०१३, दि.०२/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शासकीय जिल्हास्तर शालेय ५० खेळ प्रकारांच्या क्रीडा स्पर्धा २०१३-१४ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, पंच मानधन, पंच चहा-अल्पोपहार खर्च, नारळ,

बुके, पुजा खर्च, स्टेशनरी खर्च, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे इतर खर्च इ. सन २०१३-१४ मध्ये विभागीयस्तर स्पर्धेसाठी म.न.पा.शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटनेमार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू, त्याच्या समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवासखर्च, दैनिक भत्ता, प्रवेश फी, औषध खर्च इ. अदा करणेकामी अंदाजे र.रु.१,००,०००/- असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.९,८८,८००/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च क्रीडा निधी - वार्षिक क्रीडा स्पर्धा, क्रीडा कला साहित्य या लेखाशिर्षावर केलेल्या एकूण तरतूद र.रु.३५,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडास्पर्धा अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, ध्वनी / विद्युत व्यवस्था, मैदान तयार करणे व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा प्रभाग कार्यालयामार्फत होणार आहे.  त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च प्रभागाचे अंदाजपत्रकातून खर्ची टाकण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक - २

दिनांक - १२/०८/२०१३

सूचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.धनंजय आल्हाट

संदर्भ : मा.विमल काळे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्रमांक २८ मासुळकर कॉलनीमधील क्रीडा संकुल येथे राज्यस्तर सॉफ्ट बॉल महापौर चषक स्पर्धा घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक - ३

दिनांक - १२/०८/२०१३

सूचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.धनंजय आल्हाट

संदर्भ : मा.विमल काळे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्रमांक २८ मासुळकर कॉलनी येथे हेडगेवार भवनात व्यायामशाळा, बॅडमिंटन हॉल व योगा हॉल असून सदर भवनास पेंटींग करणे, दुरुस्ती करणे व काही भाग वाढविणे गरजेचे आहे.  सदर बिल्डिंगला गेली ७-८ वर्षापासून दुरुस्ती व पेंटींग करण्यात आलेली नाही. बिल्डिंगला सर्व ठिकाणी लिकेज आह. बॅडमिंटन हॉलच्या मॅट खराब आहेत. लाईट व

फॅनची व्यवस्था करणे गरजेचे आहे. सदर सर्व मेंन्टनन्सच्या कामाचे टेंडर काढून ही वास्तू खेळण्याच्या पूर्ण उपयोगी आणणे गरजेचे असल्याने वरील प्रमाणे सर्व कामे करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक - ४

दिनांक - १२/०८/२०१३

सूचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.धनंजय आल्हाट

संदर्भ : मा.विमल काळे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्रमांक २८ मासुळकर कॉलनी येथे हेडगेवार भवनाजवळ मोठया जागेत खेळण्याचे ग्राऊंड असून त्या ठिकाणी फुटबॉल व खो-खो साठी ग्राऊंड तयार करणेस टेंडर प्रोसिजर करावी, सदर ग्राऊंडमध्ये काही जागेत लॉनटेनिसचे कोर्ट असावे अशी नागरिकांची मागणी आहे तरी वरील ठिकाणी या तीनही सुविधा पुरविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक - ५

दिनांक - १२/०८/२०१३

सूचक - मा.विमल काळे अनुमोदक - मा.धनंजय आल्हाट

संदर्भ : मा.विमल काळे, मा.मंदाकिनी ठाकरे, मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव -

विकासनगर किवळे प्रभाग क्र.१८ मधील युवा आधार संघटनेच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड आणि पुणे जिल्हयात कराटे प्रशिक्षण वर्ग चालविण्यात येतात. त्यामध्ये बरेच शालेय विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने यावर्षी आयोजित करणेत येणा-या महापौर चषक कराटे स्पर्धेचे आयोजन विकासनगर किवळे प्रभाग क्र.१८ येथील युवा कराटे ट्रेनिंग सेंटरच्या माध्यमातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९ विषय क्रमांक - ६

दिनांक - १२/०८/२०१३

सूचक - मा.रामदास बोकड अनुमोदक - मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.रामदास बोकड, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.४५ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन फिटनेस क्लब मध्ये १) मल्टी जिम (५ स्टेशन) फ्रंट प्रेस, ल्याट पुली, लेग एक्टेंशन, पिक डेग, टयुर्स्ट, २) बेंच प्रेस, ३) इंकलाइन बेंच प्रेस, ४) डिक्लाइन बेंच, ५) क्रॉस बार, ६) फिचर कर्लिंग, ७) टी बार, ८) एब्डीबॅनल पॅड, ९) स्कॉट मशिन, १०) लेग प्रेस मशिन, ११) मल्टी बेंच, १२) ३ स्टूल, १३) पुलप्स स्टँड, १४) ५ ते ३० डंबेल्स, १५) ५ ते ३० प्लेटस्, १६) ५ ते ३० वेटबार, १७) ५ फुटी बार ३, १८) ३ फुटी बार ३, १९) २ फुटी बार ३, २०) झेड (झिकझॅक) बार २, २१) आरसे ३, २२) डबलबार इ. साहित्याचा पुरवठा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(बोकड रामदास गेणभाऊ)
**सभापती**
मा.क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/७५४/२०१३
दिनांक – १६/०८/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.